**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक २९ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

- **तिसऱ्या टप्प्यातील प्रचार सभांना वेग - आज सोलापुरात आरक्षणाला धक्का लागू न देण्याचं भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आश्वासन.**
- **राज्यात गेल्या दोन महिन्यात उष्माघाताच्या १८४ रुग्णांची नोंद- वर्धा जिल्ह्यात १६ तर बुलढाणा जिल्ह्यात १५ रुग्ण.**

- **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- मनरेगांतर्गत नागपूर विभागात बांबू लागवडीची कामे प्राधान्यानं हाती घेण्याचे महासंचालक नंदकुमार यांचे निर्देश.**
- **महावितरणच्या नागपूर परिमंडलात गेल्या आर्थिक वर्षात सर्व वर्गवारीत दिल्यात 84 हजार 672 नवीन लघुदाब वीजजोडण्या.**

*****

**तिसरा टप्पा/मोदी सभा**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात, सात मे रोजी होणाऱ्या मतदानासाठी, प्रचार शिगेला पोहोचला आहे. यात राज्यातल्या उस्मानाबाद, लातूर, रायगड, बारामती, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, कोल्हापूर, हातकणंगले, रत्नागिरी-सिंधुदुर्ग या मतदारसंघांचा समावेश आहे. याठिकणी विविध राजकीय पक्षांचे राष्ट्रीय तसंच राज्य स्तरावरील नेते संबंधित मतदारसंघांचे दौरे करून, प्रचार फेऱ्या, प्रचारसभा घेत आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या, आज आणि उद्या राज्यात सहा सभा होणार आहेत. मोदी यांनी महायुतीचे उमेदवार, राम सातपुते यांच्या प्रचारासाठी सोलापुरात सभा घेतली. संविधान आणि आरक्षण काढून घेण्याचा अपप्रचार काँग्रेस करित आहे. त्यांच्या खोट्या प्रचाराला बळी पडू नका, संविधान आणि आरक्षणाला धक्का लागू देणार नाही ही मोदीची ग्यारंटी आहे, असा विश्वास नरेंद्र मोदी यांनी सोलापूरमध्ये व्यक्त केला. त्यांनी राहुल गांधीच्या नॅशनल एक्सरे योजनेवरही टीका केली. सरकारनं वैद्यकीय परिक्षांमध्ये, ओबीसी आरक्षण लागू केलं. देशातल्या गरीब मुलांना डॉक्टर बनवायचं आहे असं त्यांनी म्हटलं. मोदी आज पुण्यात, विजय संकल्प यात्रेत सहभागी होणार

आहेत. पुण्याचे महायुती उमेदवार, मुरलीधर मोहोळ, सातारा मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार, उदयनराजे भोसले यांच्या प्रचारासाठी ते कराडमधे प्रचारसभा घेणार आहेत. मोदी उद्या माळशिरस, धाराशिव आणि लातूर इथं सभा घेतील. त्यांच्या लातूर इथल्या, बिर्ले फार्मवरच्या नियोजित सभेच्या पार्श्वभूमीवर, लातूर इथल्या वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. धाराशिव इथं तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयालगत असलेल्या, २५ एकर क्षेत्रावर मोदींची सभा होणार आहे. दरम्यान, महाविकास आघाडीची आज पुण्यात, वारजे इथं सभा होणार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, शरद पवार यावेळी उपस्थित राहतील.

**चौथा टप्पा अर्ज मागे**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातला, उमेदवारी अर्ज मागं घेण्याचा आज शेवटचा दिवस असून, उद्या या टप्प्यातल्या लढतींचं चित्र स्पष्ट होईल. या टप्प्यात देशभरातल्या ९६ मतदारसंघांचा समावेश असून, येत्या १३ मे रोजी, तिथं मतदान होणार आहे. महाराष्ट्रात अकरा ठिकाणी मतदान होणार असून, त्यात नंदुरबार, जळगाव, रावेर, बीड, जालना, औरंगाबाद, पुणे, मावळ, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी यांचा समावेश आहे.

**पाचवा टप्पा**

निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. या टप्प्यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश असून, तीन मे पर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत. महाविकास आघाडीचे दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार, विद्यमान खासदार अरविंद सावंत आणि दक्षिण-मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार, अनिल देसाई यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी श्रीसिद्धिविनायक मंदिर इथं जाऊन दर्शन घेऊन जोरदार शक्तिप्रदर्शन केलं. दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार राहुल शेवाळे यांनी देखील आज अर्ज भरला. ठाणे लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांनी आज अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी काढलेल्या रॅलीत, युवा सेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे सहभागी झाले होते. महाविकास आघाडीचे नाशिक लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार, राजाभाऊ वाजे आणि, दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार, भास्कर भगरे यांनी आज अर्ज दाखल केला. तत्पूर्वी

निघालेल्या रॅलीमध्ये, खासदार संजय राऊत, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यावेळी उपस्थित आहेत. धुळे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार, भाजपचे सुभाष भामरे यांनी देखील अर्ज दाखल केला.

**निवडणुकीचा सहावा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठीची अधिसूचना, आज जारी झाली. या टप्प्यात दिल्ली, हरयाणा, उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओडीसा आणि झारखंड या राज्यातल्या, एकूण ५७ लोकसभा मतदारसंघामधे, निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत सहा मे पर्यंत असून, मतदान २५ मे रोजी होणार आहे.

**उष्माघात/हवामान**

राज्यात उन्हाचा प्रकोप दिवसेंदिवस वाढत असून, गेल्या दोन महिन्यात उष्माघाताच्या १८४ रुग्णांची नोंद झाली. यात वर्धा जिल्ह्यातील १६ आणि बुलडाणा जिल्ह्यातील १५ उष्माघाताचे रुग्ण आहेत. राज्यात यंदा उष्माघातानं मृत्यू झाल्याची नोंद नाही. मागील २४ तासांत विदर्भात सर्वाधिक तापमान चंद्रपूर जिल्ह्यात ४१ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं. दरम्यान, येत्या दोन दिवसात, विदर्भात बहुतांश जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे त्यामुळं आज देखील नागपूरसह विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात वादळी हवामानाचा इशारा देण्यात आला आहे.

**‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण, औरंगाबाद लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. सायंकाळी सव्वासात ते साडेसात वाजेपर्यंत, आकाशवाणी मुंबईच्या, अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**मनरेगा**

बांबू लागवडीमुळं रोजगार निर्मिती, पर्यावरण रक्षण, हरित आच्छादनात वाढ होते आणि सिंचन व्यवस्था बळकट होण्यास, मदत होत असल्यानं, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अर्थात मनरेगा अंतर्गत, नागपूर विभागात बांबू लागवडीची कामे प्राधान्यानं, हाती घेण्याचे निर्देश, महाराष्ट्र मनरेगा मिशनचे

महासंचालक, नंदकुमार यांनी आज संबंधीत विभागांच्या यंत्रणांना दिलेत. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात, ‘समता मुलक, शाश्वत पर्यावरणीय विकासातून, समृध्दीसाठी मनरेगा मिशन मोडवर राबविणे’ या विषयावर नंदकुमार यांच्या अध्यक्षतेखाली, आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. मनरेगांतर्गत, चालू आर्थिक वर्षात राज्यात एक लक्ष हेक्टर क्षेत्रावर हरित आच्छादन करण्याचं उद्‌दिष्ट ठेवण्यात आलं असून, गरिबी निर्मूलनात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून, नागपूर विभागातील सहाही जिल्ह्यांमध्ये, बांबू लागवडीला प्राधान्य द्यावं, अशा सूचना नंदकुमार यांनी दिल्यात. बांबू लागवडीसाठी जलव्यवस्थापन आराखडा, कुरण विकास तसंच ‘जलतारा’ संकल्पनेच्या अंमलबजावणी संदर्भातही, त्यांनी मार्गदर्शन केलं.

**महावितरण**

नागपूर आणि वर्धा शहरांसह, महावितरणच्या नागपूर परिमंडलात गेल्या आर्थिक वर्षात, सर्व वर्गवारीत, 84 हजार 672 नवीन लघुदाब वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत. यात 65 हजार 27 घरगुती, 10 हजार 507 वाणिज्यिक, 1,349 औद्योगिक आणि पाच हजार 551 कृषी जोडण्यांचा समावेश आहे. याशिवाय परिमंडलात तब्बल, 42 ई-वाहन चार्जिंग स्टेशनला वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. ग्राहकसेवा अधिक गतिमान करण्यासाठी नवीन वीजजोडणी तत्काळ उपलब्ध करून देण्यासाठी, 'महावितरण'चे अध्यक्ष आणि संचालक व्यवस्थापकीय लोकेश चंद्र यांनी, नवीन वीज जोडण्यांचा वेग वाढविण्यावर भर दिला आहे. नागपूर परिमंडल अंतर्गत यापूर्वी, दरमहा पाच ते सहा हजार नवीन वीज जोडण्या देण्यात येत होत्या. हा वेग गेल्या आर्थिक वर्षात दरमहा सरासरी सात हजारावर वर गेला आहे.

**ऑनलाईन सट्टा**

गडचिरोली जिल्ह्यात अहेरी इथं, आयपीएलच्या सामन्यांवर ऑनलाईन सट्टा लावण्याच्या अड्ड्यावर, पोलिसांनी छापा टाकून १० जणांना अटक केली. घटनास्थळावरुन, चार मोबाईल आणि नऊ हजार ४२० रुपये जप्त करण्यात आले. महाराष्ट्र जुगारबंदी कायद्या अन्वये, गुन्हा दाखल करुन, अटक करण्यात आली.

**तृतीय पंथिओळख पत्र**

जिल्हयातील तृतीयपंथीय व्यक्तींना, नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर पर्सन, या केंद्र शासनाच्या पोर्टलद्वारे, तृतीयपंथी असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि ओळखपत्र उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याकरीता तृतीयपंथीयांसाठी, काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, तृतीयपंथीयांची मंडळे किंवा संघटना इथल्या प्रतिनिधीनी, किंवा स्वत: तृतीयपंथी व्यक्तीनं, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर कार्यालयाशी, कार्यालयीन वेळेत संपर्क साधुन, वैयक्तिक आणि रहिवाशी पुराव्याबाबतची माहिती, त्वरित सादर करण्याचं आवाहन, समाज कल्याण विभागाकडून करण्यात आलं आहे.

**अपघात**

यवतमाळ शहरा लगतच्या जामवाडी घाटात, डिझेल वाहतूक करणारा टँकर उलटल्यानं त्याला, भीषण आग लागली आहे. यात चालकानं वेळप्रसंगी उडी मारल्यानं तो बचावला, मात्र क्लिनर गोपाल पवार हा, या आगीत होरपळून ठार झाला. या आगीमुळं धुराचे लोट निघाले तर डिझेल, रस्त्यावर सांडल्यानं आग भडकली. त्यामुळं दारव्हा मार्गावरील वाहतूक बराच काळ ठप्प झाली होतं. या अपघाताची माहिती समजताच, अग्निशमन दलानं पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली.

**निसर्गाकडे चला'**

निसर्ग हा समृद्ध असून मानवाच्या सर्व गरजा पूर्ण करण्याची शक्ती त्याच्याकडे आहे. पण आधुनिकतेच्या प्रवाहात निसर्गातील प्रत्येक वस्तू प्रदूषित झाली असून, त्याचे दुष्परिणाम मानवाला भोगावे लागत आहेत. त्यामुळं 'परत फिरा आणि निसर्गाकडे चला' असा संदेश, विविध ठिकाणाहून आलेल्या फॅशन इंडस्ट्रीमध्ये कार्यरत आणि काम करू इच्छिणा-या कलाकारांनी दिला. नागपूरच्या अलग अँगल कम्युनिटी आर्ट सेंटरच्यावतीनं, 'सस्टेनिबिलिटी डायलॉग इन फॅशन' विषयावर, पाच दिवसीय निवासी कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यशाळेत गोवा, मुंबई, पुणे, अहमदनगर, नागपूरमधले सुमारे देशातील विविध ठिकाणाहून २५ कलाकार सहभागी झालेत.

**एसएसबी**

भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये, अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना, Service Selection Board अर्थात SSB या परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी, नाशिक इथं २० मे ते २९ मे या कालावधीत, SSB कोर्स आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थी, निवास, भोजन, आणि प्रशिक्षणाची नि:शुल्क सोय करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील इच्छूक उमेदवारांनी, सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, चंद्रपूर इथं नऊ मे २०२४ रोजी, मुलाखतीस हजर राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. अधिक माहितीसाठी www.Maha-sainik.Maharashtra.gov.in या संकेत स्थळावर भेट देता येईल तसंच, 91 56 07 33 06 या व्हॉटस्ॲप नंबरवर माहिती विचारता येईल.

*****